तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन हा मुद्दा स्थायी विषय म्हणून बैठकांच्या विषयसूचीमध्ये आणि क्षेत्रिय स्तरावरील निरीक्षण भेटीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१७/प्र.क्र.११९/काम ९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०१८

प्रस्तावना :-

हवामान आणि ऋतुबदल, वाढते तापमान, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष या नैसर्गिक आपत्तींची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी “हरित महाराष्ट्र” ही संकल्पना राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. त्याशिवाय सन २०१६ मध्ये दिनांक १ जुलै, २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा आगळा वेगळा व महत्वाकांक्षी कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला.

शासन निर्णय, महसुल व वन विभाग, दि. १० ऑक्टोबर, २०१६ अन्वये या कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन या विभागाच्या क्रमांक संकिर्ण २०१६/प्र.क्र. ८९/काम ९ दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ च्या परिपत्रकाअन्वये सन २०१७ ते २०१९ या कालावधीत दरवर्षी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाबाबतचे नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम राबविण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यंत केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तमरितीने होणे हे अत्यंत गरजेचे आहे, त्यानुसार या परिपत्रकाव्दारे पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक :

१. कामगार विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावरील तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन या संदर्भातील विषय प्रत्येक बैठकांच्या वेळी विषयसूचीमध्ये स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करण्यात यावा. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, यापूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण, मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड, पुढील वर्षामध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता, आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे विहीत कालावधीमध्ये पिटस् तयार करणे, निधीची उपलब्धता इत्यादी संदर्भात पूर्व तयारीबाबत आढावा घेण्यात यावा.

२. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रमासंदर्भात झालेल्या निर्णयांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करण्यात यावी. तसेच इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या निर्णयासंदर्भात झालेल्या अंमलबजावणीबाबत आणि येणाऱ्या अडचणीसंदर्भात पुढील बैठकीमध्ये चर्चा होऊन क्षेत्रिय अधिकाऱ्यांना येणाऱ्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

३. तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील जे अधिकारी क्षेत्रिय कामांना भेटी देतील, त्यावेळी त्या त्या विभागांतर्गत वृक्ष लागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. अशा क्षेत्रिय भेटीच्या वेळी संबंधित प्रशासकीय विभागांतर्गत लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्य रितीने होते किंवा नाही, मृत झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली किंवा नाही, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इत्यादी बाबींची वरीष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. त्याचप्रमाणे येणाऱ्या अडचणी सोडविण्याबाबत उपाययोजना कराव्यात.

४. तसेच प्रस्तावित वृक्ष लागवडीसाठी निवडलेली स्थळे, आवश्यक त्या परिमाणाचे पिटस् विहीत वेळेत तयार करणे आणि अशा स्थळांवर लावण्यात येणाऱ्या झाडांसाठी पाण्याची आणि संरक्षण व्यवस्था, वृक्ष लागवडीसाठी निधीची व्यवस्था, याबाबत देखील पाहणी करुन क्षेत्रिय अधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन द्यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३१४१४५५०९०८१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.03.14 14:57:21 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (कामगार व प्रशासन) यांचे स्वीय सहायक, उ.ऊ.व का.विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. सर्व सह /उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. कामगार आयुक्त,कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, सिटी पार्क जवळ, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१,
४. विकास आयुक्त (असंघटीत कामगार), कामगार भवन,भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, सिटी पार्क जवळ, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१,
५. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, ५वा मजला, ब्लॉक-ई, भूखंड क्र.सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
६. संचालक, बाष्पके, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, कामगार भवन, सातवा मजला, भूखंड क्र.सी-२०, ब्लॉक-इ, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
७. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय,प्रशासकीय इमारत, पहिला मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
८. संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परेल, मुंबई- ४०००१२.
९. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबु गेनू मुंबई गिरणी कामगार क्रिडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०००१३.
१०. निवडनस्ती (काम ९).